पहिला आठवडा इंग्लंड, ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंशिवाय

'आयपीएल'च्या सुरुवातीला प्रमुख खेळाडूंची अनुपस्थिती

वृत्तसंस्था, मुंबई

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पहिल्या आठवड्याला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे क्रिकेटपटू मुकणार आहेत. कारण 'आयपीएल'च्या १३व्या हंगामाला १९ सप्टेंबरपासून प्रारंभ होणार असल्याचे प्रशासकीय समितीचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी घोषित केले असले तरी ऑस्ट्रेलियाचा इंग्लंड दौरा मात्र १६ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.

'आयपीएल'चे वेळापत्रक हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या क्रिकेटपटूंसाठी प्रतिकूल असल्याने पहिल्या आठवड्यात संघांना त्यांच्याशिवायच हंगामाला प्रारंभ करावा लागणार आहे. ओल्ड ट्रॅफर्ड येथे १६ सप्टेंबरला इंग्लंड-ऑस्ट्रेलिया यांच्यात तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय सामना रंगणार आहे. दोन्ही संघांमधील 'आयपीएल'चे खेळाडू त्याच दिवशी किंवा १७ तारखेला लंडनहून दुबईला प्रयाण करतील. संयुक्त अरब अमिरातीत पोहोचल्यावर क्रिकेटपटूंना करोना चाचणीला सामोरे जावे लागेल. याशिवाय प्रमाणित कार्यपद्धतीनुसार विलगीकरण, आदी नियमांचे पालन करावे लागेल.

''लवकरच खेळाडू, मार्गदर्शक आणि संघांचे किंवा संघटनेचे अन्य व्यक्ती यांच्यासाठी 'बीसीसीआय' आणि 'आयपीएल' प्रमाणित कार्यपद्धती जारी करणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंना चाचणी आणि कार्यपद्धतीचे पालन केल्याशिवाय संघांचे प्रतिनिधित्व करता येणार नाही,'' असे 'आयपीएल'च्या सूत्रांनी सांगितले.

ऑस्ट्रेलियाचा संघ जुलै महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार होता. मात्र करोनाच्या साथीमुळे तीन एकदिवसीय आणि तीन ट्वेन्टी-२० सामन्यांचा दौरा सप्टेंबरपर्यंत लांबणीवर पडला आहे. या दौऱ्यावरील पहिला ट्वेन्टी-२० सामना एजेस बाऊल येथे ४ सप्टेंबरला होणार आहे. ही मालिका झाल्यास इंग्लंड आपला संपूर्ण उन्हाळी हंगाम वाचवू शकेल. त्यामुळे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाला प्रक्षेपणकर्त्यांकडून ३३ कोटी ६० लाख डॉलर्स मिळणार आहेत.

ऑस्ट्रेलियाचे १७ आणि इंग्लंडचे ११ असे या दोन देशांचे एकूण २८ क्रिकेटपटू 'आयपीएल'साठी करारबद्ध करण्यात आले आहेत. यात स्टीव्ह स्मिथ, डेव्हिड वॉर्नर, पॅट कमिन्स, बेन स्टोक्स, जोफ्रा आर्चर हे क्रिकेटपटू खात्रीपूर्वक इंग्लंड-ऑस्ट्रेलिया मालिका खेळणार असल्याने ते पहिल्या आठवड्याला मुकणार आहेत. यंदाच्या हंगामाद्वारे ऑस्ट्रेलियाच्या १७ क्रिकेटपटूंना एकूण ८६.७ कोटी रुपये तर इंग्लंडच्या ११ क्रिकेटपटूंना एकूण ४३.८ कोटी रुपये मानधन मिळणार आहे.

❍ संयुक्त अरब अमिरातीमध्ये दाखल झाल्यावर तेथील सरकारी नियमानुसार क्रिकेटपटूंची कोविड १९ चाचणी घेण्यात येईल. जर करोना चाचणी नकारात्मक आली, तरच त्यांना अलगीकरण कक्षातून बाहेर पडण्याची परवानगी मिळू शकेल. या संपूर्ण प्रक्रियेला ४८ ते ७२ तास लागतील.

❍ आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) प्रमाणित कार्यपद्धतीचे पालन करावे लागेल. त्यामुळे इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेटपटूंना आपल्या 'आयपीएल' संघाकडून खेळण्यासाठी सात ते १० दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

'आयपीएल'साठी आफ्रिकेच्या १० खेळाडूंना 'ना हरकत प्रमाणपत्र'

नवी दिल्ली : यावर्षीच्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या १० खेळाडूंना 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात आले आहे. एबी डीव्हिलियर्स, ख्रिस मॉरिस, डेल स्टेन, क्विंटन डीकॉक, फॅफ ड्यू प्लेसिस, इम्रान ताहिर, लुंगी एन्गिडी, कॅगिसो रबाडा, हार्डस विलोजेन आणि डेव्हिड मिलर यांना हे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे दक्षिण आफ्रिका क्रिकेट मंडळाचे प्रसिद्धीमाध्यम व्यवस्थापक कोकेत्सू गाओफेटोगे यांनी सांगितले. ते म्हणाले की, ''आयपीएलमध्ये खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंना सर्वतोपरी मदत केली जाईल. १० खेळाडूंना आम्ही 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले आहे.''

विंडीज पराभवाच्या छायेत

इंग्लंड-वेस्ट इंडिज कसोटी मालिका

मँचेस्टर : वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडने तिसऱ्या दिवशी पहिल्या डावात सहा आणि दुसऱ्या डावात दोन बळी घेतल्याने इंग्लंडला कसोटी मालिका २-१ अशी जिंकण्याची सोमवारी संधी आहे. वेस्ट इंडिजसमोर तिसरी आणि निर्णायक कसोटी जिंकण्यासाठी ३९९ धावांचे लक्ष्य ठेवण्यात आले. मात्र विंडिजची ते लक्ष्य गाठताना दिवसअखेर २ बाद १० धावा अशी स्थिती झाली.

तत्पूर्वी, इंग्लंडने त्यांचा दुसरा डाव २ बाद २२६ धावांवर घोषित करत दिवसातील अखेरचा अर्धा तास विंडिजला खेळण्यासाठी दिला. मात्र लयीत असणाऱ्या ब्रॉडने सुरुवातीलाच विंडिजची २ बाद ६ धावा अशी स्थिती करून टाकली. ब्रॉडने याबरोबरच कसोटी कारकीर्दीतील बळींची संख्या ४९९ वर नेली. जेम्स अँडरसननंतर ५०० कसोटी बळी घेणारा दुसरा गोलंदाज होण्याची ब्रॉडला संधी आहे.

तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात विंडिजच्या पहिल्या डावातील उर्वरित चार बळी ब्रॉडनेच घेतले. विंडिजचा पहिला डाव १९७ धावांत संपल्याने इंग्लंडला १७२ धावांची आघाडी घेता आली होती.

SUPPLYCO
THE KERALA STATE CIVIL SUPPLIES CORPORATION LIMITED
MAVELI BHAVAN, P.B. NO. 2030, GANDHINAGAR, KOCHI - 682020
Ph : PABX- 0484 - 2206775, 2206795, Purchase Section : Ph : 0484 2207924, 2206786, 2206782.
Fax : 0484 2206782, 2206799 • Email : agmp@supplycomail.com • Web : www.supplycokerala.com
No.P.10/19947/2020 Date: 24.07.2020

निविदा सूचना
(केवळ इलेक्ट्रॉनिक टेंडरिंग सिस्टममार्फत)

दि केरला स्टेट सिव्हील सप्लाइज कॉर्पोरेशन लि. (सप्लायको) हे ई-निविदेच्या माध्यमातून डाळी, साखर खरेदी करावयास इच्छुक असून या निविदा **दि. 30-07-2020 रोजी दु. 2.00 वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील. तपशीलासाठी आमच्या वेबसाईटला www.supplycokerala.com किंवा www.tenderwizard.com/KSCSC येथे भेट द्यावी. सप्लायको हे ई-निविदेच्या माध्यमातून पालड, शेवया कापडी पिशव्यासुद्धा खरेदी करावयास इच्छुक असून या निविदा **दि. 03.08.2020 रोजी दु. 02.00 वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील आणि तपशीलासाठी आमच्या वेबसाईटला www.supplycokerala.com किंवा **www.etenders.kerala.gov.in** येथे भेट द्यावी. केवळ डिजिटल स्वाक्षरीधारक पुरवठादारांनाच सदर ई-निविदेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल.
स्वा/- अतिरिक्त महाव्यवस्थापक (खरेदी)

इंडसइंड बँक
CIN: L65191PN1994PLC076333
नोंदणीकृत कार्यालय: 2401, जनरल थीम्माय्या रोड, कँटोनमेंट, पुणे - 411 001.
सेक्रेटरिअल आणि इन्व्हेस्टर सर्व्हिसेस: 731, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, 167, गुरू हरगोविंदजी मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093.
• **दूरध्वनी:** (022) 6641 2487 • **वेबसाइट:** www.indusind.com
• **ईमेल:** investor@indusind.com

सूचना

सिक्युरिटीज ॲन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स् ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायर्मेन्टस्) रेग्युलेशन्स्, २०१५ च्या नियम २९ आणि नियम ४७ अन्वये ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की इतर कामकाजांबरोबर ३० जून २०२० रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय परिणामांवर विचार करण्यासाठी आणि ते संमत करण्यासाठी, बँकेच्या संचालक मंडळाची सभा मुंबई येथे मंगळवार, २८ जुलै २०२० रोजी होईल, आणि सेबी (इश्यू ऑफ कॅपिटल ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायर्मेन्टस्) नियमने, २०१८, आणि कंपन्या कायदा, २०१३ व त्यात केलेल्या सुधारणा, यांमधील तरतुदींनुसार इक्विटी भागांचे वितरण प्रेफरेन्शियल तत्वावर करून निधी उभा करण्याबद्दल विचार करण्यात येईल, जे आवश्यक असेल त्यानुसार अशा नियामक/वैधानिक मंजुरींच्या अधीन राहील.

ही सूचना www.indusind.com/investor.html या बँकेच्या संकेतस्थळांवर आणि www.bseindia.com आणि www.nseindia.com या स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध आहे.

इंडसइंड बँक लिमिटेडसाठी
सही / -
हरेश के. गजवानी
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण: मुंबई
दिनांक: २६ जुलै, २०२०

टीप:

भागधारकांनी आरटीए/ बँकेच्या सेक्रेटरीयल व इन्वेस्टर सर्विसेस टीमशी संपर्क साधून, त्यांच्या नावे **आर्थिक वर्ष २०१२-१३** पासूनचा दावा न केलेला लाभांश, काही असल्यास, लवकरात लवकर दावा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, २००९-१०, २०१०-११ आणि २०११-१२ पासून, सलग सात किंवा अधिक वर्षे ज्यांच्या संबंधातील लाभांश दिला गेलेला नाही किंवा त्याबद्दल दावा केलेला नाही असे समभाग आयइपीएफ अधिकरणाकडे हस्तांतरीत केलेले आहेत आणि यापूर्वीच आयइपीएफ अधिकरणाकडे स्थानांतरीत केल्या गेलेल्या समभागांसाठी आर्थिक वर्ष २०१७-२०१८ आणि २०१८-२०१९ साठी जाहीर केलेला डिविडंड आयइपीएफ अधिकरणाला जमा करण्यात आला आहे. रिफंडबद्दल दावा करण्याची कार्यपद्धती येथे उपलब्ध आहे: http://www.iepf.gov.in/IEPF/refund.html

सेंच्युरी एनका लिमिटेड
सीआयएन : एल24304पीएन1965पीएलसी139075
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट क्र. 72 आणि 72 - ए, एमआयडीसी, भोसरी, पुणे - 411026
दू. क्र. 020-66127300, **फॅक्स:** 020-27120113
वेबसाईट : www.centuryenka.com
ईमेल आयडी : cel.investor@birlacentury.com

सूचना

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या (लिस्टिंगऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, 2015 च्या नियम 47 सह वाचल्या जाणाऱ्या नियम 29 च्या अनुषंगाने ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की 30 जून 2020 रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्ष विचार करण्यासाठी आणि ते संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, 4 ऑगस्ट 2020 रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना बीएसई लिमिटेड (www.bseindia.com), दि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) आणि कंपनीच्या (www.centuryenka.com) ह्या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध आहे.

सेंच्युरी एनका लिमिटेड, साठी
सी.बी.गगराणी
कंपनी सचीव

ठिकाण: मुंबई
दिनांक:25.07.2020

- पुणे महानगरपालिका -
निविदा प्रक्रिया कक्ष
पाणीपुरवठा विभाग - निविदा जाहिरात नवीन कामे
जाहिरात क्र. १/२४२, दिनांक २४/७/२०२०
विक्री कालावधी दिनांक- २७/०७/२०२० ते ०३/०८/२०२०
स्वीकृती दिनांक- ०३/०८/२०२० दुपारी ३.०० पर्यंत **तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक-** ४/०८/२०२०, दुपारी ३.०० नंतर

Pune अद्वितीय & Unique

अ.क्र.	टेंडर क्रमांक	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत र.रू.	अंदाजित पूर्वगणित रक्कम रू.	बयाणा रक्कम रु.	कामाची मुदत	निविदाविषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक
८.	PMC/ WATER_Supply / 2020/159	पाणीपुरवठा विभाग	जुने लष्कर जलकेंद्र येथील पंपाची दुरुस्ती विषयक कामे करणे	१,३५९.००	२४,९८,४५६.७६	२४,९८५.००	१२ महिने	श्री.सुरेश पवार ९६८९९३१०५७

अ) पुणे म.न.पा.ची वरील कामे ही अनुभवी ठेकेदारांकडून करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी, शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून, सदर कामाचे निविदा संच **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून, सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ(वि)/३२/२२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस./ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फत स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता(विद्युत)
लष्कर जलकेंद्र,
पुणे महानगरपालिका

करार नगरपरिषद, करार जा.नं.: नपा/आरोग्य: ६०२०२०००००२९८५ दिनांक:- २२/०७/२०२०

अल्प मुदतीची जाहिर टेंडर नोटीस क्रमांक ३९/२०२०-२१
शहर सफाई विभाग (आरोग्य विभाग)

अ. न.	कामाचे नांव	बयाणा	टेंडर फॉर्म किंमत रूपये (ना परतावा)	कामाची मुदत दिवस
१	कराड नगरपरिषदेच्या नागरी आरोग्य केंद्रामध्ये सी सी टीव्ही कॅमेरा पुरविणे व बसविणे.	२५००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	१०
२	नगरपरिषदेच्या जे. सी. बी. मशीन करीता मागील व पुढील टायर ट्युब पुरविणे व बसविणे.	१५००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	१०
३	नगरपरिषदेच्या ट्रॅक्टर क्रमांक एम एच ११ ई २६७२ करीता टायर ट्युब पुरविणे व बसविणे.	५००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	१०
४	नगरपरिषदेचा ५० टन क्षमतेचा वजन काटा पार्सिंग करून देणे व १ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे.	४००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	३६५
५	नगरपरिषदेचा वजन काटा पार्सिंग कामी आवश्यक असणारे लोखंडी वजने पुरविणे.	७००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	१०
६	कराड नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी जर्मीक्लीन जंतुनाशक पुरविणे.	५००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	२०
७	आरोग्य विभागासाठी नविन १ लेजर व १ ऑल ईन वन प्रिंटर पुरविणे.	३००/-	५००/- +जी एस टी १८ % ९० = ५९०	२०

वरील कामासंबंधीच्या अटी, शर्ती व इतर माहिती नगरपरिषदेच्या सार्व,आरोग्य विभागात मिळेल.कोरे निविदा फॉर्मस एक खिडकी योजना या विभागात दिनांक २८/०७/२०२० ते दिनांक ०७/०८/२०२० अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रविवार व सुट्टीचा दिवस सोडून विकत मिळतील. सदर कामासाठी दुहेरी लिफाफा पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे.

(अ) लिफाफा क्र.१ मध्ये
१) इसारा रक्कम रोख स्वरूपात भरलेली पावती जोडणे आवश्यक आहे.
२) आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे, बँकेचे कागदपत्रे, पॅनकार्ड झेरॉक्स,
३) पुर्वानुभवाची कागदपत्रे.
४) नोंदणी व परवाना प्रमाणपत्र असलेस जोडावे.
५) सदर कामास नगरसेवकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग राहणार नाही. याबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडण्याचे आहे.
६) निविदाकाराचे वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबतचे कुलमुखत्यार पत्र जोडावे.

(ब) लिफाफा क्र. २ मध्ये निविदा फॉर्मवर दरपत्रक अक्षरी व अंकात नमुद करण्याचे आहे.

सदर कामाच्या सीलबंद निविदा दि. १०/०८/२०२० रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत मा. मुख्याधिकारी साहेब, कराड नगरपरिषद,कराड. यांचे नावे समक्ष आणून देण्याचे आहेत. पाकिटावर कामाचे नांव, स्वतःचे नांव, पत्ता स्पष्टपणे नमूद करण्याचा आहे. टपालाने पाठविलेल्या निविदा नगरपरिषदेस उशीरा मिळाल्यास अथवा गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी नगरपरिषदेवर राहणार नाही. मुदतीनंतर अगर बयाणा रक्कमेशिवाय आलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा मंजूर करण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नामंजूर करण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत कोणतेही कारण अथवा लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच टेंडर मंजुरीनंतर एस्टिमेंट रकमेवरती भरावयाची रोख रक्कम १.५० टक्के आणि बिलातुन वजा करावयाची २.५० टक्के हि रक्कम अशी एकत्रित मिळुन ४ टक्के मिळणारे बिलातुन वजा करणेत येईल.

शिक्का

सही : यशवंत डांगे
मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद,कराड.

PUBLIC NOTICE

IT IS HEREBY INFORMED that **A.A. ESTATE PRIVATE LIMITED**, a Company having its registered office at RNA Corporate Park, Next to Collector's office, Kalanagar, Bandra(E),Mumbai –400051 is in the process of developing/re-developing the lands owned by Maharashtra Housing and Area Development Authority ("MHADA") and leased to Kher Nagar Vivekanand Co-operative Housing Society Limited being all that pieces and parcels of land or ground bearing Survey No. 341(Part) and City Survey No. 604 (Part) in Kher Nagar Mhada layout admeasuring 1837.14 sq. meters. together with tit bit area admeasuring 456.86 sq. mtrs. aggregating to 2294.00 sq. mtrs. along with the building known as Building/Structure No.10 **Kher Nagar Vivekanand CHS Ltd.** standing thereon lying, being and situate at Kher Nagar, Bandra (East),Mumbai-400051 (collectively "**the said Property**" and more particularly described in the **SCHEDULE** hereunder written) by virtue of various agreements entered into by and between **Kher Nagar Vivekanand CHS Ltd. and A.A. Estate Private Limited.**

PLEASE TAKE NOTICE that we, on behalf of our clients, are investigating the right, title and interest of A.A. Estate Private Limited as developer and **Kher Nagar Vivekanand CHS Ltd. as lessee of the said Property**, arising out of the Agreements, to the said Property owned by MHADA and occupied by the tenants/occupants residing in the premises comprised therein.

All persons having any claim, demand, share, right, title or interest in respect of the said Property and/or any part(s) thereof by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, maintenance, inheritance, succession, possession, lease, sub- lease, tenancy, sub-tenancy, occupancy, lien, easement, license, sub-license, pledge, guarantee, loans, advances, development rights, Floor Space Index (FSI), Transferable Development Rights (TDR), right of prescription or pre-emption, encumbrance, attachment or under any injunction, order, judgment, decree, award, settlement, arrangement,compromise or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with copies of supporting documents to the undersigned, within a period of 15 (fifteen) days from the date of publication hereof, failing which, the claim, demand, share, right, title or interest, if any, of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned.

THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:

ALL that piece or parcel of land or ground bearing Survey No.341(Part) and City Survey No.604 (Part) in Kher Nagar Mhada layout admeasuring 1837.14 sq. meters. together with tit bit area admeasuring 456.86 sq.mtrs. aggregating to 2294.00 sq. mtrs. along with the building known as Building No.10 **"Kher Nagar Vivekanand CHS Ltd.** standing thereon lying, being and situate at Kher Nagar, Bandra (East),Mumbai-400051 in the District Mumbai Suburban in the Registration District of Mumbai Suburban and bounded as follows:-

On or towards the North by : Bldg. No. 8 and 9;
On or towards the South by : Garden;
On or towards the East by : Service Road;
On or towards the West by : 40'.00 Wide Road.

Dated this 27th day of July, 2020

Mr. Sadhawa N. Mishra (Partner)
M/s. SNG & Partners, Advocates & Solicitors.
96, Free Press House, Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai 400021.

Education and examinations in the times of Covid: what is at stake?

E-XPLAINED by The Indian EXPRESS

with

Professor V Ramgopal Rao
Director, IIT-Delhi

The Covid-19 pandemic has wrecked academic calendars and thrown teaching processes in schools and colleges completely off-track. Over 37 million students across India stare at the prospect of a truncated education this year. The gap in the development of knowledge may take years to be bridged, especially for students from poorer economic backgrounds. For students of higher and technical education, job prospects and professional futures are at stake.

To be part of a discussion around this topic, join us at a session of E-xplained with Professor V Ramgopal Rao, Director, IIT-Delhi

in conversation with

Ritika Chopra
Senior Assistant Editor, The Indian Express

29 JULY 2020 | 07:00PM | Join us on zoom

To register, SMS - IEEXP <space> "FE" <space> "Your name and email ID" to 56161
Confirmation SMS will be your registration.

The Indian EXPRESS
JOURNALISM OF COURAGE

IndianExpress.com/apps | twitter.com/IndianExpress | facebook.com/IndianExpress

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७ ● लोकसत्ता कार्यालय : एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१.
दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४००००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम** * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.